# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक ०८ | मुंबई | मार्च, २०१८ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## महिला दिनाच्या निमित्ताने

—सुहासिनी कीर्तिकर

२३ फेब्रुवारीच्या वृत्तपत्रीय अंकात अगदी पहिल्या पानावर अवनी चतुर्वेदी झळकली. लढाऊ विमान उडवणारी ती पहिली भारतीय महिला ठरली. फोटोतील तिच्या चेहऱ्यावरचे हास्य भारतीय अस्मितेच्या मनात चांदणे फुलवून गेले. तशी तर कल्पना चावलानेही थेट चंद्रयानात उसळी घेऊन भारतीय मनांना भारून टाकले होते. विविध क्षेत्रात आपलं नाव, कर्तृत्व शिक्कामोर्तब करणाऱ्या अशा अनेक भारतीय महिला आहेत की ज्यांनी पहिलेपणाचा मान पटकावला आहे. प्रतिभा पाटील या भारताच्या पहिल्या अध्यक्ष. इंदिरा गांधी या भारताच्या पहिल्या पंतप्रधान. सुमित्रा महाजन लोकसभेच्या पहिल्या महिला सभापती. आंतरराष्ट्रीय स्तरांवर अनेक खेळांत 'सिंधू" लहरी उमटताहेत. इतिहास सांगतो की जगातील पहिली महिला गणितज्ञ 'लीलावती' होती. ही अभिमान वाटावा अशी नारीशक्तीची परंपरा फार फार प्राचीन आहे.

पण ज्या परंपरेचा आपण टेंभा मिरवतो त्या टेंभ्याच्या प्रकाशात भारतीय संस्कृतीचे जुनाट, बुरसट, अप्रागतिक रूपही दुर्दैवाने दिसत राहते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते। रमन्ते तत्र देवता।' असं म्हणायला सोपे आहे हो. पण यत्र, तत्र भारतीय संस्कृतीचा सदोष आरसाही आपल्याला भेडसावत रहातो. चार एक वर्षांपूर्वी दिल्लीत चालत्या बसमध्ये मित्रासवे असणाऱ्या तरुणीवर चार चार लोकांनी भर दिवसा बलात्कार केला अन् त्या दोघांना खाली रस्त्यावर फेकून दिले. नंतर मोर्चे निघाले. टॉर्च मार्च झाला, पण 'निर्भया' केस अशी समाजात पुरुषी संस्कृतीचा अहंकार मिरवत केसाकेसानं वाढतच राहिली. म्हणून तर 'कोपरी' हत्याकाण्ड घडले ना! नीला सत्यनारायण या आय. ए. एस. अधिकारी आपल्या निवृत्तीनंतर 'सरकारी' कारनामे लिहित्या झाल्या. कायदा मोडण्याला 'नाही' म्हटले की स्त्रीत्वाची जाणीव करून देऊन त्या स्त्रीत्वाची विटंबना आरंभायची असा हा 'सरकारी' भ्रष्टाचार. असं 'सालंकृत देहदान' नाही म्हटलं की मग बदली, वेगवेगळ्या आरोपांची फैर किंवा दिल्लीत महाराष्ट्र सदनात 'ड्यूटी' वर नेऊन शील भ्रष्ट करण्याचा प्रयत्न! मजल्यावरील आपल्या खोलीच्या वरच्या काचवाल्या खिडकीतून उडी मारण्याचा खरोखरचा पवित्रा घेऊन मग या 'स्त्री' ला बचाव करावा लागला. प्रियकराला 'नाही' म्हटलं म्हणून, लग्न होण्याआधी शरीरसंबंधांना नकार दिला म्हणून, बायको बदचालीची आहे अशा फक्त संशयावरून, आईनं मोबाइल घ्यायला पैसे देण्याचे नाकारले म्हणून, शेजारच्या घरात उगाच नाक खुपसत समझोत्याचा प्रयत्न केला म्हणून.... अशा मानवी हक्काच्या आणि संस्कृतीसंपन्न वागण्याच्या कारणास्तव त्या त्या स्त्रियांना क्रूरपणं संपविण्यात आलं. कधी गळा चिरून, कधी डोक्यात कुकर घालून, कधी मारझोड करून, कधी...., कधी...; पण पुरुषांनी त्यांना संपवलं. स्त्रीपुरुष समानता, मानवी हक्काचा कायदा, उज्ज्वल परंपरा, कर्तृत्वाची क्षितिजे जिंकण्याची स्त्री शक्ती..... इ. इ. कुठे जातं हो अशावेळी? पुरुषी वर्चस्व असणारी सनातन समाजवृत्ती स्त्रियांना, बालिकांना, स्त्रीभ्रूणांना आपल्या खास पद्धतीनं संपवून टाकताना आजही दिसत आहे. अशावेळी पवित्र कुटुंबनातेही काही प्रसंगी राखलं जात नाही. वडीलच मुलीशी अनैतिक चाळे करतात. स्वत:च्या बायकोला लाच म्हणून देऊन (फ्लेश करन्सी म्हणून वापरून) वरच्या अधिकाऱ्यांना संतुष्ट केलं जातं. हे सगळं दाखवायला आपल्याला नामदेव ढसाळ किंवा जयंत पवारच कशाला हवेत?

बरं. या सुसंस्कृती असणाऱ्या समाजाच्या अपवादात्मक प्रवृत्ती म्हणू या हवं तर. पण आजही एका समाजस्तरात लग्नाच्या पहिल्या रात्री वधू 'पाक' असल्याचा शारीरिक पुरावा द्यावा लागतोय. नाही तर मग भयंकर शिक्षा त्या वधूला! एका विशिष्ट जमातीत मुलगी बालिकावस्थेत असतानाच, तिचा 'खतना' रीतसर केला जातो. का? तर तिने तरुणपणी 'गुण' उधळू नये म्हणून. बलात्कारासारखी घटना चर्चेत आली तर समाजधुरीण किंवा मग मंत्रीमहोदय सल्ला देतात की स्त्रियांनीच पोशाख नीट घालावा. 'नीट' म्हणजे काय? उच्छृंखल घालू नये; पण अद्ययावतही घालू नये? मग इतर काही देशांत पडदा पद्धत आहे तशीच ठेवायची का आपल्या देशात?

'प्रश्नोपनिषद' संपणारे नाहीच. एकीकडे देऊळबंदीविरूद्ध स्त्रिया 'डोईचा पदर आला खांद्यावरी' असं जनाबाईप्रमाणं म्हणत शनिदेवाचे ओटे चढताहेत, हाजीअली दर्ग्यात थेट पोहोचताहेत. समाजसुधारकांवर 'रघुनाथ धोंडो कर्वे', 'पॅडमन' सारखे पुरुष सुधारक चित्रपट काढून जागरण करताहेत. महिन्यातील 'ते' चार दिवस एकेकाळी स्त्रीच्या बाबतीत गुप्तता राखण्याची वा खाजगीतील गोष्ट होती. त्याबद्दल आता सर्रास खुल्लमखुल्ला चर्चा होताहेत. का? तर या सगळ्या सामाजिक प्रथांचा अतिरेक होतोय म्हणूनच ना? ज्ञानेश्वरांच्याही आधीचा चक्रधरस्वामींचा महानुभाव पंथ. चक्रधरस्वामी याबाबतीत मुक्त आणि सुधारकी विचारांचेच म्हटले पाहिजेत. एकदा त्यांची शिष्या महदाईसा समाजरीत म्हणून विटाळ पाळू लागली तर; ते म्हणाले, 'जैसे मनुष्याचे श्लेष्म, लाळ, तैसेचि तो आंगीचा रसु:' म्हणजे नाकातील शेंबूड, तोंडातील लाळ जशी सहज शरीरधर्म, त्याप्रमाणेच हादेखील मासिकधर्म. पण काही काही बाबतीत कालचक्र उलटं फिरते. आजही यावर चर्चा करावीशी वाटते. जागृती करावीशी वाटते. याला कारण काय? तर समाजाची पुरुषप्रधान संस्कृती आणि जातीपातीची उतरंड. म्हणूनच 'मुलगी शिकली, प्रगती झाली' अशा टॅक्सी, रिक्शांच्या पाठीवर पाट्या लावून काहीच होणार नाही. 'कं नीयते; सा कन्या।' अशी कन्या शब्दाची व्युत्पत्ती आहे. म्हणजे जी जन्मताच 'हिला कोण नेणार?' असा प्रश्न ती कन्या! मग प्रतिष्ठेचं पांघरूण घालून ती 'सुकन्या' करतील समाजवृत्ती. पण ही धारणाच किती चुकीची ना? असं म्हणतात की बाजीराव पेशवा यांची रणनीती खूप तयारीची होती. या रणनीतीनुसार ते म्हणायचे की 'मूळावर घाव घातला की फांद्या आपोआप खाली येतात.' म्हणजे दिल्ली तक्त फोडले की देशभरचे शत्रू (फांद्या) आपोआप आपल्या छत्राखाली येतील. समाजवृक्ष तरारून फोफावावा असं वाटत असेल तर स्त्रीवर होणारे अत्याचार, अनिष्ट रूढी - प्रथा, तिच्या सामाजिक-कौटुंबीक स्थानाविषयीचे गैरसमज (वा स्वार्थी विचार) या मूळांवरच घाव घालायला हवा. आपोआपच समाजातील इतर अप्रगत विचार वा प्रथा नामशेष होतील.

असो. आपल्या परभू संस्कृतीत सुदैवाने असे स्त्रीवर अत्याचार क्वचितच होतात. (हां. पण एकदा केतकी जयकर किंवा बागेश्री परीख किंवा प्रणिता प्रभाकर यांना विचारलं पाहिजे!) तेव्हा या परभू संस्कृतीत चपखल बसेल असा विश्वास प्रगट करून आठ मार्च रोजीच्या जागतिक महिला दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा.

हो! अन् मन:पूर्वक शुभेच्छा दहावी, बारावीच्या, पदवी आणि पदव्युत्तर परीक्षार्थी विद्यार्थ्यांनाही. गुणवंत आहातच. यशवंत आणि कीर्तिवंत व्हा.

# एक स्वैर, मुक्त चिंतन

**सुंदरताई नवलकर**

एका रविवारी 'साहित्य सौरभ' म्हणून एक कार्यक्रम रेडिओत होता. 'साहित्य' कसे सौंदर्यवान असावे याबाबत जनतेशी संवाद होता तो. तो ऐकला. तेव्हा एका महिलेने जे वर्णन केले ते फारच छानदार होते.

'साहित्य' म्हणजे केवळ लेखनच नव्हे तर आपण बोलताना, आपले विचार मांडताना, इतरांशी आपल्या बोलीने संपर्क राखताना जे आपण 'शब्द वापरतो - उच्चारतो', ज्या नाट्यमय कृतीने सादर करतो, यात नेहमी सौंदर्य असायलाच हवे, तरच; जनतेशी 'मैत्री' होऊ शकते. 'मैत्री' म्हणजे आपण आपले व इतरांचे जीवन सुंदरतेने जगण्याची गुरुकिल्ली आहे. (हे परवा प्रोफेसर सुहासिनी कीर्तिकर यांनी 'साहित्य सौरभ' या मालिकेत (रेडिओ) 'मैत्र' या विषयावर लेख सादर केला त्यात म्हटल्याप्रमाणे) त्या संदर्भात वर म्हटलेल्या भगिनीनी साहित्य सौंदर्यवान असायला हवे. ते कसे? हे सांगताना त्या म्हणाल्या - ''आपण आपल्या घरच्या रामरगाड्यात केसांबाबत पर्टीक्युलर नसतो, परंतु मात्र, आपण समाजापुढे जातो तेव्हा आपण केसांची ठेवण इतकी टापटीप ठेवतो, केस विंचरून सरळ करून खुशीने 'आंबाडा' घालतो, त्यावर फुले रुळवितो व टापटीपपणे सजून समाजापुढे वावरत असतो, ज्यामुळे आपणास भेटणारा कोणीही खूश होतो. साहित्याबाबत तसेच असते.

काय आहे, - कोणी काय पेहराव करावा, कोणी केसांचा भांग कसा करावा किंवा कशी वेणी फणी करावी हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. त्यात हस्तक्षेप कोणीच करू शकत नाही; परंतु म्हणून आपण 'स्वैरपणे वागणे' म्हणजे तो एक वेडगळपणाच नव्हे का? - सौंदर्य 'केसातही' आहे. तरुणपणी केसात एखादी 'पांढरी छटा' केसाच्या झुपक्यात दिसली की मनाला धक्का बसतो (विशेषतः त्याला किंवा तिला आयुष्याचा योग्य जोडीदार निवडण्याचे बाकी असेल तेव्हा) मग मेंदी लावा - कलप लावा हे प्रयोग होतात. परंतु प्रथमपासूनच आपण त्या केसांना महत्त्व देऊन त्यांना सुशोभितपणे ठेवत आलो तर आपणास सतत भेटणाऱ्यांना आपल्या पांढऱ्या केसाची काळजी वाटत नाही.

सांगायचा मुद्दा की म्हणून आपण आपले केस उनाडपणे भिरकावून देऊन व ती फॅशन आहे असे वेडगळपणाचे समाधान मानावे हे चमत्कारीकच नाही का? आजच्या तरुणी आपला ड्रेस चांगल्या सुटसुटीत वाटेल अशा तऱ्हेने (नऊवारी किंवा सहावारीचा नाद सोडून) लेहंगा खमीज, पल्लू किंवा पॅन्ट शर्ट, छोटा ब्लाऊज घालून त्यांच्यातील सुंदरताही प्रगट करीत आहेत. मात्र त्या त्यांच्या केसांना स्वैरपणे नाचत ठेवण्यात त्यांना काय सौंदर्य आवडते बरे!

कोर्टदरबार किंवा समाजात सुसंस्कृत व विद्येने शानदार व प्रतिष्ठीत हुद्यावर असताना त्या महिलांच्या 'झिपऱ्या' पाहणाऱ्याला तिच्या वेगळेपणाचा नमुना पाहायला मिळाला असे वाटणे शक्य नाही काही! असो 'आंबाड्याचे महत्त्व यावेळी समजते म्हणून हा दाखला सादर केला.

आंबाड्याचा आणखीन एक विनोदी प्रसंग माझ्या स्वप्नात मी पहिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी व जेटली यांनी संसदेत बजेटचे समर्थन करतानाचा वृत्तांत रेडिओमधून ऐकताना संसदेत विरोधक कसे गोंगाट करत होते. हे ऐकल्यानंतर त्या रात्री मला स्वप्न पडले ते असे-

एका बाजूला पंतप्रधान मोदी व जेटली अर्थमंत्री त्यांच्या बजेटच्या समर्थनार्थ भाषण करीत होते व त्याचबरोबर भाजपाचे एम. पी. सभासद त्यांना प्रोत्साहन देत होते, तर दुसऱ्या बाजूला महिला एम.पी.च्या हद्दीत सुषमा स्वराज आणि त्यांच्या पक्षाच्या संसदीय सभासद (महिला सभासद) आणि विरोधी पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे व त्यांच्या विरोधी आघाडीच्या महिला आपआपले केस झटकून पिंजून कंगवा फिरवून आंबाडे बांधण्याच्या खटपटी लटपटी करीत होत्या आणि त्याचबरोबर त्यांचे पल्लू कंबरेभोवती घट्ट आवळून घेऊन त्या धम्माल मानसिकतेत पुढे पुढे सरकून नरेंद्र मोदींच्या दिशेने घोषणा देत निघाल्या होत्या. सुषमा स्वराज यांचा आवाज दणदणीत आणि निर्धारी होता. विरोध प्रगट करतानाही साहित्याची शालीनता, पवित्रता, सुंदरता, सुसंस्कृत परंपरेचा आदर संसदेत पाहण्यास मिळाला. अर्थातच हे स्वप्न म्हणजे एक मौज आणि सुखद अनुभव होता. सुप्रिया सुळे मात्र सोनीया गांधींचा लेक राहूल गांधी यांनी जे शिव्याशापाचे धडे दिले होते त्याप्रमाणे घोषणा देत होत्या व मोदींचा आवाज बंद करण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत होत्या.

साहित्याचा व नीटनेटक्या आंबाड्याचा कसा संबंध येतो ते कळलेच. खरे ना?

⁎

उद्यम्

# इंस्टंट सूप मेकिंग प्रोजेक्ट

**-सुदेश प्रबोध देसाई**

विचार करा, तुमच्या समोर मस्त लालभडक सुवासिक गरमागरम स्वादिष्ट सूप सर्व्ह केले, मग टोमॅटो सूप असो किंवा मनचॉव सूप, हॉट अँड सॉर सूप, स्वीट कॉर्न सूप, चिकन सूप, टेस्टी कोलंबी सूप, मिक्स व्हेज सूप असो; नुसते हे विचार करताच आपल्या तोंडाला पाणी सुटले असेल.

तुम्ही जर स्वतःची तब्बेत सांभाळणारे असाल तर हेल्थ सूप घ्यावे. तसेच डायबिटिज कंट्रोल करणारे सूप, ब्लडप्रेशर कंट्रोल करणारे सूप, तसेच बारीक होण्याचे सूप आपण घेऊ शकतो. हेच सूप एखादी गृहिणी बनवायला गेली तर बराच वेळ व कष्ट घ्यावे लागतात. (जे सूप बनवतात त्यांना माहीत असेलच) हे लक्षात घेऊन आपण इंस्टंट सूप व्यवसाय सुरू करू शकतो. वर दिलेले सर्व प्रकार आपण इंस्टंट रेडी टू कूक पॅकेट फॉर्ममध्ये बनवून देऊ शकतो.

हा व्यवसाय खूप मोठा आहे. नॉर व मॅगी ह्या कंपन्यानी इंस्टंट सूप कसे बनवायचे हे लोकांना शिकविले आहे. आपण याची संधी घेऊन नेहमीचे सूप भारत व भारताच्या बाहेर पोहचवू शकतो.

इंस्टंट सूप बनविण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे-

कच्चा माल, डिहायड्रेशन, ग्राईंडिंग, मिक्सिंग, टेस्टिंग, पॅकिंग.

❖ आता आपण टोमॅटो सूपसंबंधी माहिती घेऊया :

१ प्रथम ताजे टोमॅटो घ्या. त्याचे पातळ काप करून डिहायड्रेट करून त्याची पावडर तयार करा.

२ नंतर गरम मसाले घेऊन डिहायड्रेट करून त्याची पावडर करून ती त्यात मिक्स करणे.

३ ताजी कोथिंबीर घेऊन चांगली साफ करून डिहायड्रेट करून ती मिश्रणात मिक्स करावी.

४ सर्व पावडरी चांगल्या प्रकारे मिक्स कराव्यात. हात लावू नये.

५ एअर टाईट पॅकेटमध्ये पॅक करून त्या पॅकेटला लेबल लावून मार्केटमध्ये विकण्यासाठी ठेवावे.

डिहाड्रेशनचा प्रोजेक्ट छोट्या स्वरूपात सुरू करावयाचा असेल तर रू ५०,०००/- पर्यंत मशिनरीची इनव्हेस्टमेंट येईल.

समजा, आपण टोमॅटो सूपचे पॅकेट करून रोज १०० किलो विकले तर...

१ किलो टोमॅटो सूप पावडर करण्यासाठी आपल्याला रु. २००/- खर्च येतो. विक्रीची किंमत बाजारात रु. ६००/- ते रु. १८००/- प्रती किलो आहे.(एमआरपी)

समजा, आपण फक्त रु. १००/- फायदा घेतला तर,

१०० किलो X रु. १००/- = १०,००० फायदा प्रतिदिवस.

रु. १०,००० X २५दिवस = २,५०,०००/- फायदा प्रति महिना.

२,५०,००० X १२ महिने = ३०,००,०००/- फायदा प्रति वार्षिक.

समजा, वरील फायदा तुम्हाला खूपच कमी वाटला तर, १००० किलोचे प्रॉडक्शन रोज करा.

१,००० किलो X रु. १००/- फायदा प्रति किलो तर दिवसाला = रु. १,००,०००/- फायदा प्रति दिवस होईल.

२५ दिवसाचे X रु. १,००,०००/- = २५,००,०००/- फायदा प्रति महिना.

२५,००,००० X १२ महिने = ३,००,००,०००/- फायदा प्रति वर्ष.

इंस्टंट टोमॅटो सूपसाठी भारतात खूपच चांगले मार्केट आहे. तसेच भारताच्या बाहेरसुद्धा त्याला चांगले मार्केट आहे. फक्त इंस्टंट सूपमध्ये प्रॉडक्टचे विविध प्रकार घेऊन उत्पादन केले असता आपण भरपूर प्रमाणात फायदा करू शकतो.

मार्केटिंगसाठी सगळ्या किराणा मालाच्या दुकानातून किंवा मोठे रिटेलर्स उदा. बिग बाझार, अपना बाजार, स्टार बाजार, इनर आऊट लेटमध्ये सप्लाय करू शकतो. तसेच ऑनलाईन मार्केटिंग करून आपले टार्गेट पूर्ण होऊ शकते.

अधिक माहितीसाठी संपर्क :
९२२३३५७२०७
ईमेल आयडी :
sudesh69desai@gmail.com

⁎

## पाठारे प्रभु सोशल समाज

⁎ ३१ मार्च २०१८ पर्यंत असलेल्या सोशल समाज सभासदांची यादी खालील कार्यवाहांकडे उपलब्ध आहे. सौ. नीता मि. सेंजित ९८२०१६६६६२८ आणि श्री. जयंत बा. कीर्तिकर ९८६७९५८५३५


**ऑगस्ट, सप्टेंबर २०१८ मध्ये होऊ घातलेल्या निवडणुकीच्या संदर्भात आपले नाव सभासद यादीत आहे की नाही; हे कृपया पडताळून पहावे.**

⁎ सोशल समाजाचा १३० वा वर्धापन दिन आणि पुरस्कार सोहळा गुढीपाडवा, रविवार दि. १८ मार्च २०१८ रोजी सायंकाळी ५ वाजता पाठारे प्रभु को-ऑप. सोसायटीच्या

(पान ६ कॉलम ४ वर)

# माझा मामा

✶ डॉ. सुषमा पौडवाल ✶



माझा मामा कुंजविहारी गोविंदराव नवलकर. सांताक्रूझला जुहू रोडला सूर्योदय बंगल्यात राहणारे नवलकर कुटुंबीय. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे सख्खे-चुलत आजोबा, आजी, मावश्या, मामा, माम्या या सर्वांचं नांदतं गोकुळ. लहानपणी पहिली काही वर्षं आणि नंतर मे महिन्याच्या सुट्ट्या मी या कुटुंबात राहिले. तिथल्या मायेच्या नि आपुलकीच्या धाग्यांनी मी कायम बांधली गेले. मनातला कोपरा व्यापला या सर्वच कुटुंबीयांनी. त्यातही सर्वांत आवडती व्यक्ती म्हणजे माझा मामा.

जगात जर प्रामाणिकपणा, सचोटी आणि वक्तशीरपणाला बक्षीस दिलं जात असतं, तर ते मामालाच द्यायला लागलं असतं. एकदा ऑफिसमधून परतताना त्याला एक गलेलठ्ठ पैशाने भरलेलं पाकिट रस्त्यात पडलेलं दिसलं. त्याने त्यातलं कार्ड काढून पत्ता शोधून त्या व्यक्तीला परत केलं. ते गृहस्थ रेक्स कंपनीत मोठ्या पदावर कार्यरत होते. पाकिटात पगाराचे पैसे होते. मामाच्या प्रामाणिकपणामुळे ते भारावले गेले. त्यानंतर मामाने नाकारले तरी कित्येक वर्षं ते रेक्स कंपनीची सरबतं पाठवत राहिले.

भाची म्हणून माझ्यासाठी तो मी मागेन ते देणारा सांताक्लॉज होता. सकाळी घराबाहेर पडताना मी त्याच्याकडे बाहुली, भातुकली, टेलिफोन अशी कित्येक खेळणी मागत असे. संध्याकाळी मामा ती खेळणी घेऊन आला नाही असं कधी झालं नाही. घरात दागिन्यांची तिजोरी होती. ती बघून मी एकदा त्याला चक्क फर्मावलं, ''मला तिजोरी आण.'' संध्याकाळी मामा काळी पत्र्याची दहा क्रमांकाने उघडणारी तिजोरी घेऊन आला. ती वरून पैसे टाकायची बचतबँक होती. हे लाड मात्र मला नंतर चांगलेच भोवले. आजोळाहून आई-बाबांकडे आल्यावर आयुष्य फारच कठीण वाटायला लागलं. नंतर कितीतरी वर्षं आजारपणात 'मामाला मला भेटायला बोलवा तरच मी बरी होईन' असा हट्ट मी धरत असे आणि मामा मला भेटायला यायचाही. दरवर्षी माझ्या वाढदिवसाला तो हमखास येई. जे माझ्याबाबतीत तेच आमच्या पुढच्या पिढीच्या बाबतीत झालं. सर्वांचे वाढदिवस लक्षात ठेवून त्यांना बक्षिसं देण्यात त्याचा हात कुणी धरू शकला नसता. असंच एकदा मी त्याला म्हटलं, ''एवढं महाग बक्षिस का आणलंस रे?'' तो म्हणाला, ''मला मुलांचे हरखलेले आनंदी चेहरे पहायला आवडतात.''

मामाचा स्वभाव विनोदीही होता. एकदा गणिताच्या परीक्षेला मी सकाळच्या पेपरला दुपारी गेले. परीक्षा बुडली. तेव्हापासून बरीच वर्षं मला गणोबा, गणोबा म्हणून चिडवत असे.त्यात माझं गणित कच्चं. त्यामुळे मी हा पेपर टाळला असं त्याचं म्हणणं. मामीने ''काय हो तिला सारखं चिडवता!'' अशी मध्यस्थी केली नसती तर मी रडलेच असते.

रिझर्व बँकेत आणि नंतर नाबार्ड मध्ये उच्च पदावर काम करतानाही त्याचा स्वभाव शांत आणि निगर्वी राहिला. नोकरीच्या निमित्ताने तो लखनौ, कलकत्ता, अहमदाबाद, जपान, भारतात आणि भारताबाहेरही फिरला. तो नोकरी करत असताना पांढरे कपडे वापरत असे. नंतर त्याला जर्सी आणि लग्नकार्यात सूट घालायला आवडे. निवृत्तीनंतर दहा वर्षांपेक्षा अधिक काळ त्याला पेपर तपासणी व उमेदवारांच्या मुलाखतींच्या निमित्ताने बँकेचं काम करण्याची संधी मिळाली.तो सांगत असे, उमेदवारांची कुठेही नोकरीसाठी जायची तयारी असायला हवी. कित्येकदा जागा मुंबईतच भरायची असते. तरीही उमेदवाराला विचारलं जातं, ''तुमची बाहेरगावी नियुक्ती केली तर जाल का?'' उमेदवार म्हणतात,''आम्ही घरी विचारतो.'' मग कशी मिळेल नोकरी? एकदा मी त्याला म्हटलं, मी स्वेच्छानिवृत्ती घ्यायचा विचार करतेय. म्हणजे आपल्याला हवं ते आरामात करता येईल. मामाने मला वेड्यात काढलं. म्हणाला, '' छे. काहीतरी काय बोलतेस? आमच्यासारखं मोठं आयुष्य असेल तर पुढे काय करशील?'' विषय तिथेच संपला. मला त्याचं म्हणणं पटलं. पण कुणी विचारलं नाही तर तो अकारण सल्ले मात्र द्यायचा नाही.

एकंदरीत, अद्ययावतता त्याच्या स्वभावातच होती. यामुळे त्याची पावलं काळाबरोबर पडत राहिली. जगात 'थांबला तो संपला' हे तत्त्व त्याने ओळखलं होतं. नव्या पिढीशी जुळवून घेऊन सर्वांशी मित्रत्वाचं नातं जोडण्याचं अवघड काम त्याला लीलया साधलं होतं. त्यामुळेच त्याच्या संपर्कात असलेले भाचे, भाच्या, त्यांची मुलं या सर्वांना योग्य ते मार्गदर्शन मिळालं. एटीएम कार्डचा वापर, संगणक, टॅली सॉफ्टवेअर, व्हॉटस् अप या आजच्या अनेक उपयुक्त गोष्टी त्याने नवीन पिढीकडून शिकून घेतल्या. वयाच्या सत्तरीत तो संगणक आणि टॅली शिकला. स्मरणशक्ती तल्लख रहावी म्हणून तो दरवर्षी एक स्तोत्र पाठ करीत असे आणि ते म्हणून दाखवून आम्हाला चकीत करत असे. तसंच सुडोकूही सोडवत असे.

मामीच्या निधनानंतर बरेचदा माझा त्याच्याशी दूरध्वनीवर संपर्क होता. माझ्या निवृत्तीनंतर मी त्याच्या घरी भेटायलाही जात असे. तासंतास काही विषयांवर आमच्या गप्पा चालत. लोकसत्तेतील पाककृतींच्या पुस्तकांच्या आमच्या लेखमालेबद्दल ऐकल्यावर त्याने सांगितलं, ''हे लेखन इंग्रजीत आणायचा प्रयत्न कर. लेखनाला मोठा वाचकवर्ग लाभणं आवश्यक आहे.'' पाठारे प्रभू ज्ञातीबद्दल त्याला रास्त अभिमान होता. ''तेला-तुपाचं आणि विलासी खानपान असूनही कुणी पाठारे प्रभू सत्तरीच्या आत गेला असं उदाहरण तुला सापडणार नाही.'' तो म्हणे. तसंच भाऊचा धक्का हा भाऊ ऊर्फ लक्ष्मण हरी अजिंक्य याने १९व्या शतकात बांधला ही माहिती त्यानेच मोठ्या अभिमानाने दिली. मला पाठारे प्रभूंच्या पाककृती टी.व्ही.वर दाखवायच्या होत्या. तसंच पाठारे प्रभू खाद्यसंस्कृतीवर लिहायचं होतं. मामाबरोबर तासभर केलेली चर्चा फारच उपयुक्त ठरली. पूर्वी सकाळच्या नाश्त्याची संकल्पना आपल्यात नव्हती. ती इंग्रजांबरोबर आली. चाकरमानी खाकरा (पाठारे प्रभूंचा) व चहा पिऊन किंवा जेवूनच कार्यालयात जात असत. अशा गोष्टी सांगताना तो मलाही 'आपल्यात' धरत असे!

मामीच्या आजारात त्याने स्वत:ला तिच्या सेवेत झोकून दिलं. तिला एकही दिवस एकटं सोडलं नाही. तिच्या निधनानंतर आम्ही सतत दूरध्वनीवरून संपर्कात होतो. १४ जूनला मामाच्या वाढदिवशी दरवर्षी मी आणि माझ्या मावश्या त्याच्याबरोबर जेवून दिवस घालवत असू. एका वर्षी मी किशोर आरसांचा 'अंतर्नाद' मासिकातला पाठारे प्रभूंवरचा लेख वाचून दाखवला. लेख ऐकताना तो गालातल्या गालात हसत होता.

मामा ब्रह्मविद्या ८६व्या वर्षी शिकला. नेमाने दीड तास दीर्घ श्वसन, ध्यान आणि साधना करत राहिला. आजही पाठकबाई शिकवताना प्राथमिक वर्गात आपल्या या ज्येष्ठ शिष्याचे उदाहरण देतात. संध्याकाळी नियमित जवळच्या बागेत फिरायला जात असे. तिथे त्याच्या मित्रांचा गृपही तयार झाला. सप्टेंबर २०१७ पर्यंत तो झपाझपा चालत बागेत जात होता.

४ ऑक्टोबर २०१७ रोजी वयाच्या ८९व्या वर्षी मामा आम्हाला सोडून परलोकयात्रेला निघून गेला. खरंतर अर्थपूर्ण जगण्यासाठी त्याचा आदर्श घ्यावा अशा कितीतरी गोष्टी तो आमच्या मनात ठेवून. ज्येष्ठांनी आपला मान राखून सतत कार्यमग्न आणि हसतमुख कसं रहावं याचा वस्तुपाठच त्याने आम्हाला घालून दिला. आज मामा नाही, पण त्याच्या असंख्य आठवणी आम्हा सर्व कुटुंबीयांच्या मनात तेवत राहतील.

✶

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



संवाद

# गोल्ड रश

**-विश्वास अजिंक्य**

(मागील अंकावरून)

कित्येकांची भावना तर घरच्यांना सोडून, जीवाचे हाल करून, एवढा मोठा प्रवास करून कशाला येथे आलो?; अशीच झाली होती. कित्येकदा लांबच्या प्रवासाने थकूनभागून बरेच प्रवासी आजारी अवस्थेतच बंदरात उतरत त्यावेळी सोन्याच्या खाणीवर काम करण्यासाठी जायला त्यांच्यात काही त्राणच राहत नसे. पण सोन्याचे आकर्षणच एवढे जबरदस्त होते की, लाखो लोक घरदार, बायको-मुले सोडून कॅलिफोर्नियाला आले. सुरुवातीला म्हणजे १८४८-५०च्या दरम्यान सोने सहजपणे उपलब्ध होत होते व एका ठिकाणी मिळणारे सोने काढून झाल्यावर आणखीन थोड्या दूरच्या जागी गेल्यावर नव्याने सोने मिळत होते. नंतर आलेल्या लोकांना काहीच मिळाले नाही असे नाही. पण तेथील राहणीमानच एवढे महाग होते, की सोने विकून मिळालेले पैसे खर्च होऊन जात. मोठ्या संख्येने लोक आल्यामुळे सगळ्याच वस्तूंची मागणी वाढली. त्यामानाने पुरवठा कमी. बऱ्याचशा वस्तू दूरवरून आणाव्या लागत असल्यामुळे भाव अव्वाच्या सव्वा. आकाशाला भिडलेले. त्यामुळे सोने मिळवण्यासाठी आलेल्या लोकांना त्यांच्या गरजेच्या वस्तू पुरविणे हाच एक मोठा व्यवसाय झाला. खाणकामाला लागणारे साहित्य पुरवणारे, तंबू विकणारे, किराणामाल-भाजीपाला विकणारे, कपडालत्ता-भाडीकुंडी विकणारे असे अनेक व्यवसाय तेथे सुरू झाले. बँकांनी त्यांच्या शाखा सुरू केल्या. तर विमा कंपन्यांनीदेखील तेथे व्यवसाय सुरू केला. सोने मिळविण्यासाठी आलेल्या लोकांना त्यांच्या गरजेच्या वस्तू पुरवण्याचा व्यवसाय करणाऱ्यांना सोन्याच्या शोधात आलेल्या लोकांपेक्षा जास्त पैसे मिळत होते. गोल्ड फिल्डवरील आयुष्य कष्टमय आणि त्रासाचे होते. त्यामुळे बरेच लोक दारू, जुगाराच्या नादी लागत. खोदकाम करून मिळविलेले सोने विकूनच त्यांना दैनंदिन खर्च भागवावा लागत असे. सोन्याचे वजन करून, योग्य तो भाव ठरवून तेथील बँका, सोने विकत घेणाऱ्या कंपन्या अथवा व्यापारी लोकांना आपले सोने

(पान ६ कॉलम १ वर)

# पाठारे प्रभु महिला समाज वार्षिक बक्षिस समारंभ

पाठारे प्रभु महिला समाजाचा १०३ वा वार्षिक बक्षिस समारंभ रविवार दि. ४ फेब्रुवारी २०१८ रोजी सायंकाळी ५.३० वा. डॉ. सौ. प्रज्ञा नायक - चित्राव एम. ए; पी.एच.डी. यांच्या अध्यक्षतेखाली बहुसंख्य श्रोत्यांच्या उपस्थितीत पाठारे प्रभु को-ऑप. सो. च्या केंद्रीय सभागृह, १२ वा रस्ता खार (प.) येथे मोठ्या उत्साहात पार पडला. समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता सेंजित व उपाध्यक्षा सौ. साया नवलकर यांनी समाजाच्या कार्यकारी समितीच्या सहकार्याने समारंभाची व्यवस्था चोख ठेवली होती.

समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता सेंजित यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. प्रज्ञा नायक-चित्राव यांचा परिचय करून दिला. नंतर त्यांनी डॉ. प्रज्ञा यांना फुलांची परडी, प्रवासाची बॅग व तेलपोळ्या देऊन सन्मानित केले. समाजाच्या उपाध्यक्षा सौ. साया नवलकर यांनी परिचय करून दिलेल्या रौप्यपदक विजेत्या भगिनींना रौप्यपदक व पुष्पगुच्छ देऊन डॉ. प्रज्ञा यांनी सन्मानित केले. तसेच चिटणीस सौ. रश्मा विजयकर यांनी त्या दिवशीच्या सत्कारमूर्ती श्रीमती मृदुला आगासकर जोशी व म.टा.च्या पत्रकार सौ. कल्पना राणे यांचा परिचय करून दिल्यावर मृदुला यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व तेल पोळ्या देऊन आणि सौ. कल्पना यांना शेला, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ व तेलपोळ्या देऊन डॉ. प्रज्ञा यांनी सन्मानित केले. सौ. गीता धराधर-आंबवणे, डॉ. सौ. आश्विनी देसाई-वाघ, सौ. स्मृती शीतल तळपदे, कु. करिश्मा अजय जयकर व कु. अनुष्का आशिष नवलकर यांना वर्षभरात केलेल्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन डॉ. प्रज्ञा यांनी गौरव केला. विशेष म्हणजे सौ. शेफाली विजयकर यांनी समाजाच्या शिवणवर्गासाठी आनंद मेळाव्याला सहकार्य केल्याबद्दल त्यांना प्रवासी बॅग व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांनी सन्मानित केले. त्यानंतर डॉ. प्रज्ञा यांनी भगिनींना शैक्षणिक व स्पर्धेतील विजेती पारितोषिके दिली. डॉ. प्रज्ञा यांनी आपल्या भाषणात आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी केल्या पाहिजेत याचे सुरेख विवेचन केले. त्यांनी आपल्या आईवडिलांच्या स्मरणार्थ पाठारे प्रभु महिला समाजाला १ लाख रुपयांची भरघोस देणगी दिली.

श्रीमती नलिनी तळपदे रचित गीते सौ. देवश्री धुरंधर यांनी सुस्वर आवाजात गायिली. संगीत दिग्दर्शन व संवादिनीला साथ श्री. शेषनाथ पावसकर व तबल्याची साथ श्री. प्रदीप राणे यांनी दिली. त्या तिघांनाही समाजातर्फे सन्मानित करण्यात आले. समारंभाचे सूत्रसंचालन चिटणीस सौ. पल्लवी कोठारे यांनी केले. सौ. छाया विजयकरांनी देणग्या वाचून दाखविल्यानंतर सौ. रश्मा विजयकरांनी सर्वांचे आभार मानले. राष्ट्रगीत झाल्यावर उपस्थितांना स्वादिष्ट कुल्फी व बटाटेवाड्यांचा अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

✶ पाठारे प्रभु महिला समाजातर्फे रविवार दि. १५ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून चैत्राचे वासंतिक हळदीकुंकू आयोजित केले आहे. हा समारंभ पाठारे प्रभु को. ऑप. हाऊसिंग सांस्कृतिक केंद्रात प्रभु नगर, १२ वा रस्ता, खार (प.) येथे साजरा करण्यात येईल. तरी ज्ञातीय भगिनींनी उपस्थित रहावे. त्या दिवशी सभासद भगिनी व १५ वर्षाखालील मुलींसाठी पुढील स्पर्धा घेण्यात येतील. अधिक माहितीसाठी चिटणीस सौ. पल्लवी कोठारे (मो.नं. ९८६७६६४७८९), सौ. नूतन कीर्तिकर (९६१९१६८१३१; २६०४९१५९), सौ. रश्मा विजयकर (९८२०९८१८८२; २२०१३८८३) यांच्याशी संपर्क साधावा.

(१) फॅन्सी ड्रेस स्पर्धा (मुली व महिला) (२) वक्तृत्व स्पर्धा - मराठी (मुली व महिला) (३) वक्तृत्व स्पर्धा - हिंदी (महिला) (४) कलात्मक पाककृती स्पर्धा (महिला) (५) रांगोळी स्पर्धा (महिला) (६) चित्रकला स्पर्धा (मुली - ५ ते ८ व ९ ते १५ वर्षे)

✳

# TRIBUTE TO GURU PATNI SOU. GEETA SADASHIV GORAKSHAKAR

**Ketaki R. Jayakar**

Geetakaku to my children and Rajan and myself suddenly left us last week.

Geetakaku and Mr. Sadashiv Gorakshakar were the pillars of the Prince of Wales Museum for about twenty-two years. Geetakaku, the very demure, warm loving hostess who was always in the background supporting all the activities undertaken by her husband the Director of the Museum Mr. Gorakshakar.

Mr. Sadashiv Gorakshakar is an international Museologist and has curated countless exhibitions, given numerous lectures, taught and trained students from all over the world that he has begotten a huge international family and the credit goes to his loving wife Sou. Geetakaku.

Geetakaku originally from a CKP family had a love marriage with Mr. Gorakshakar in1966 and had become more of a Pathare Prabhu than any born Parbhin!. She had adopted to her family consisting of Mr.Gorakshakar's mother and his unmarried sisters and cousins, and could cook any parbhi recepe better than a parbhin.

Rajan's association with Mr. Gorakshakar goes back to 1975 when we were just married. Since then every Saturday evening Rajan spent time with Mr. Gorakshakar and Geeta kaku in their quaint Director's bungalow in the Prince of Wales Museum. Of course Mukunda their only son was always around as loving, warm and gentle as his mother.

Rajan and myself have been associated with all the Museum functions and have seen the respect and love which Geeta Kaku received from the staff of the Museum as well as the guests and the V.I.P.s. One sees a lot of high ranking officials' wives acting as the Chairman and the M.D., but Geetakaku was a different cup of tea. I have never seen her in the front row or pushing herself in the front to be photographed with the VIP., yet her hand was there in the background taking care of the staff and students, working late to complete deadlines, arranging for their food and their stay if they had missed the last train.

After retirement Mr. Gorakshakar built a house at Washind and lived with Geetakaku on their farmhouse at Washind. Geetakaku happy that she was anywhere, took to farming, growing vegetables and fruits and giving large baskets of the farm fresh product to all the visitors who would lovingly call upon them. She was extremely close to her two grandsons who would tell her all the happenings of their school/college life. Her daughter in law Vidya very proudly told me that they would share more with Geetakaku than with her. Such a lovely pat of approval from a daughter-in-law!

Indeed she was an ideal Gurupatni , Mother, Aji, mother-in law who will be missed by all the international family and friends!

# आयुष्याचा सुवर्णकाळ

-सौ. प्रणिता प्रभाकर

पन्नाशी किंवा पन्नास हा आकडा सुवर्णकाळ किंवा सुवर्णमध्य म्हणून संबोधला जातो. ह्याच अनुषंगाने आपण आपल्या आयुष्याकडे पाहिले तर आयुष्याचा सुवर्णमध्य नक्कीच निघू शकतो.

आज वयाची पन्नास वर्षे पूर्ण झाली किंवा त्याहूनही अधिक वर्षे लोटली असतील ; परंतु ह्याचा अर्थ असा नव्हे की उर्वरित आयुष्य जगण्याचे सोडून दिले पाहिजे. उलटपक्षी आजपर्यंत आपण जे काही कष्ट केले त्याची फळे भोगण्याची हीच ती वेळ होय. सर्वसाधारणपणे आपण वहिवाट चोखाळण्यात पटाईत असतो. म्हणजेच स्वकष्टाची कमाई असूनही तिचा विनियोग करताना मन जरा कचरते.(सवयीचा परिणाम. दुसरे काय?) आपण नेहमीच उद्याचा विचार करत आलो, भविष्यात जगण्याचा! परंतु आजचा विचार कधीच केला जात नाही. किंबहुना करतच नाही.

वयाची पन्नाशी गाठेपर्यंत मुले मोठी झालेली असतात. शिक्षण पूर्ण करून नोकरी व्यवसाय करण्यास सुरवात केलेली असते आणि आयुष्य प्रस्थापित करण्याच्या मार्गावर ते असतात. त्यांना मोठे करण्याची व स्वत:च्या पायावर उभे राहण्याची जबाबदारी आपण आई-वडील ह्या नात्याने पूर्ण केलेली असते.तेंव्हा ह्या पुढेही आपण त्यांना कुबड्या देण्यापेक्षा आपण केलेल्या कष्टाचे चीज खरोखरच झाले किंवा नाही ह्याकडे कौतुकाने पाहण्याचा दृष्टिकोन ठेवला पाहिजे . आत्ताचा वेळ व पैसा हा आपण आपल्यासाठी खर्च करणे महत्त्वाचे आहे.डॉक्टर कडे आणि औषधासाठी पैसा खर्च करण्यापेक्षा आपण जर वेळ आपल्यासाठी खर्च केला तर आपली जगण्याची उमेद वाढेल आणि आनंद द्विगुणित होईल . मुलांनातवंडांसोबत आपणही आनंदाने राहू शकतो. ह्यापरिस दुसरे सुख ते काय?

ह्या सुखाच्या शोधासाठी आपण स्वत:करिता वेळ खर्च केला पाहिजे.एकदा आरशासमोर उभे राहून स्वत:ला शोधण्याचा प्रयत्न केल्यास निश्चितच सुखाचा मार्ग सापडेल. आयुष्यात अनेक मनसुबे रचले गेले असतील. परंतु परिस्थितीमुळे ते पूर्णत्वास जाऊ शकले नसतील; तर आता हीच वेळ आहे त्या मनसुब्यांना तडीस नेण्याची. आता फक्त आपण स्वत:चा व आयुष्याच्या जोडीदाराचा विचार करावयास हवा व दोघांनी मिळून उर्वरित आयुष्याची आखणी करावयाची आहे.त्यासाठी दोघांच्याही तब्येतीची साथ असणे महत्त्वाचे आहे. तेव्हा थोडा व्यायाम, पर्यटन आणि योग्य आहार ह्या त्रिगुणींचा त्रिवेणी संगम झाल्यास काय मजा येईल! त्याकरिता आयुष्यात जमवलेल्या पूंजीचा यथार्थ उपयोग करा. मौज,मजा ह्याच्यासोबत मन व तन तरुण ठेवण्याचा प्रयत्न करा. म्हणजेच 'आता माझे वय झाले' हे म्हणण्यापेक्षा 'अजून यौवनात मी ' असे म्हणा व आपल्या मनाला जे पटेल आणि योग्य वाटेल ते करण्यास कचरू नका.आपल्या आयुष्याच्या जोडीदारावर प्रेम करायचे राहून गेले असेल तर तेही करून पहा. लोक काय म्हणतील ह्याचा विचार न करणेच बरे. कारण लोक नेहमी बोलण्यासाठीच टपलेले असतात. 'गेले करावयाचेच राहुनी' ही खंत मनात बाळगू नका. असे केल्याने आपण तर आनंदी राहतोच पण आपल्या जोडीदारासह घरही आनंदी राहाते.

ह्या घडीला आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही ह्याची काळजी घेणे महत्त्वाचे ठरेल. त्याकरिता आपला अधिकाधिक वेळ जुन्या मित्र मैत्रिणींसोबत घालवा किंवा एखादा राहून गेलेला छंद जोपासा. ज्यात आपला जास्तीत जास्त वेळ जाईल व मनाची उभारी टिकून राहील. त्यामुळे मुलाच्या किंवा मुलीच्या संसारात लुडबूड होत नाही.कारण आपल्याला व्यवधानच खूप असतात.

ह्याचा अर्थ असा नाही की तुमची ताटातूट व्हावी ही माझी इच्छा आहे! परंतु आपल्याला सुवर्णमध्य काढावयाचा किंवा शोधावयाचा आहे.तेंव्हा....

नातवंडांमध्ये रममाण व्हा. परंतु जरा जपूनच. वास्तविक नातवंडे म्हणजे दुधावरची सायच जणू.तेंव्हा तिला खूप जपावे लागते, तिला तडा जाता कामा नये . असे केल्याने मुलांनाही व आपल्यालाही सुखाने जगता येईल.

सुख-सुख म्हणतात ते काय असते? जे केले असता मन आनंदी होते!! निरपेक्ष जीवन जगणे हाच एक आता सुखाचा मंत्र जपणे योग्य ठरेल!!!

✳

## प्रकाशातील परभू

# पूजा प्रणव देसाई

## Creative Hair stylist & Makeup Artist



Passionate about exploring her creativity, Pooja trained as a makeup artist under the guidance of industry experts Kanta Motwani, Vipul Bhagat and Bhondu. There was no looking back from the day she started in the year 2000. She continued her journey by exploring the booming hair dressing industry and mastered the basics of the profession at the prestigious Nalini & Yasmin salon in Mumbai.

She kick started her career at the newly launched Kromkay Salon located in the posh Breach Candy area and gained finesse and honed her skills by travelling across the globe. With a mission to learn from the best in the industry, she trained at the world renowned Hair dressing Academy of Vidaal Sassoon in London and Toni and Guy in Singapore.

Pooja successfully ran her 1st franchise of Kromakay in Chembur for over 5 years. As the Creative Director at Kromakay, Pooja steered the team and under her guidance the salon has participated in various styling competitions. Her work portfolio also includes styling commercial projects for Fashion Brands – Print and TVC Ads and editorial shoots with top lifestyle and fashion magazines.

In the wedding season, Pooja works her magic touch and transforms Brides on the D-day with her skills. Her simple yet elegant approach to the art form; makes her the star makeup artist at Kromakay. She also heads the makeup department for all the five branches across Mumbai.

Currently leading the Training Academy at the Kromakay Image Salons Pvt Ltd, she is the Senior Head for training stylists in basic Hair Dressing and Makeup. With the core mission of designing programs which provide diverse knowledge and skills, the institute will be the perfect platform for beginners to learn basic, technically advanced and current trends in Hair Dressing and Makeup.

Pooja has mentored, trained and styled all participants for the Femina Miss India Pageant, of whom Manushri Chillar went on to win the Miss World 2017 title

Most recently she worked with high profile dignitaries Mr and Mrs Benjamin Netanyahu, the Prime Minister of Israel

And his wife. They were in India on a diplomatic visit aimed at strengthening of ties between the two nations.

✳

## पत्र प्रतिक्रिया

My dear Suhasini and Vaijayanti,

I am happy to share the news with you that my book titled "Learning Hindustani Classical Vocal Music" published in U.S.A. has been accepted by the Library of U.S.Congress, Washington for its collection. I understand this is the biggest library in the world.

Regards,
Pt. Sujan Rane

**Congratulations**

## अभिनंदन



*Dr. Paresh Vijaysen Navalkar was invited by Parliamentary Standing Committee on Health to present his views on National Medical Commission Bill at Parliament House New Delhi*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शालाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कोर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर


## प्रभुतरुणास देणगी

✶ डॉ. प्रदीप गजानन विजयकर यांजकडून त्यांची कन्या डॉ. मिताली हिचा शुभविवाह सौ. सुमन आणि श्री. गौतम सुरेश नायक यांचे ज्येष्ठ पुत्र श्री. महेश यांच्याशी झाल्याप्रीत्यर्थ रु. २५००/-

✶ सौ. स्वाती आणि श्री. संदीप शरद देसाई यांजकडून त्यांची कन्या कु. दीप्ती हिचा शुभविवाह श्री. वीरधवल दीपक तळपदे यांच्याशी झाल्याप्रीत्यर्थ रु. २००/-

✳

(पान ४ कॉलम २ वरून)

विकून अन्नधान्य, भाजीपाला व इतर गरजेच्या वस्तू ते विकत घेत. काही लोक मिळालेले सोने घेऊन स्वत:च आपापल्या राज्यात अथवा देशात परत जात असत. कॅलिफोर्नियातील त्यावेळचे गव्हर्नर आर. बी. मॅसन यांनी अमेरिकन सरकारला पाठवलेल्या अहवालानुसार तेथे प्रत्येकजण रोज एक ते तीन औंस सोने मिळवीत असे. तर कॅलिफोर्नियात मिळालेल्या सोन्यामुळे ७५ कोटी डॉलर्स चलनात आले असा अंदाज आहे. १८४८ साली सुरू झालेली ही सोन्यासाठीची झुंबड १८५५ पर्यंत टिकली. त्यानंतर सोने मिळणे बंद झाले असे नाही; पण एक-दोन व्यक्तींना खोदकाम करून सहजपणे मिळणाऱ्या सोन्याचे प्रमाण कमी होत गेल्यावर ही झुंबड ओसरली.

(क्रमश:)


**Statement about ownership and other particulars about news paper**

**PRABHU TARUN**
**Form IV (See Rule 8)**
**To be published in the first issue after the last day of February**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Place of Publication | : | B3 Parijat Patel Estate, Jogeshwari, Mumbai-400 102. |
| 2) | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3) | Printers Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| 4) | Address | : | Same as above |
| | Editors Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| | Nationality | : | Indian |
| 5) | Address | : | Same as above |
| 6) | Name & Addres of Individuals who own the News Paper and Partners of Sharehold holding more than one Percent of Capital. | : | Board of Trustees Prabhu Tarun |

I Smt. Suhasini Kirtikar hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**01-03-2018** **Suhasini Kirtikar**
Mumbai Signature of Publisher


## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

| | |
|---|---|
| १८-१-१८ | सौ. उर्मिला आणि श्री. आदिनाथ महेश कोठारे, कन्या, कांदिवली |

### नांदा सौख्यभरे

| | |
|---|---|
| ११-२-१८ | श्री. वीरधवल दीपक तळपदे कु. दीप्ती संदीप देसाई |
| १८-२-१८ | श्री. महेश गौतम नायक डॉ. कु. मिताली प्रदीप विजयकर |
| १८-२-१८ | श्री. आदित्य अलर्क देसाई कु. आरती सुनील पुरव (आं. ज्ञा.) |
| २४-२-१८ | कु. लालिमा नीतिन नवलकर श्री. रोहन शरद मालुसरे (आं. ज्ञा.) |

### विवाह रौप्यमहोत्सव

| | |
|---|---|
| ०७-२-१८ | श्री. बालम मनोहर त्रिलोकेकर कु. पल्लवी गजानन देसाई |
| १४-२-१८ | श्री. सचिन जयबाळ विजयकर कु. रॉनिका रंजन विजयकर |
| २६-२-१८ | श्री. सुनील मुकुंद नवलकर कु. साया नागेन्द्र तळपदे |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १२-१-१८ | श्रीम. स्मिता मनोहर प्रधान, | वय ८७, | दादर |
| २४-१-१८ | श्रीम. नंदा अरविंद नवलकर, | वय ८२, | खानस्टेट |
| १५-२-१८ | श्री. मदनमोहन एस. नवलकर, | वय ८८, | प्रभादेवी |
| १६-२-१८ | श्रीम. नलिनी विनायक जयकर | वय ८९, | राणेवाडी |
| १६-२-१८ | श्रीम. सुधा सुरेश प्रधान, | वय ८८, | मुलुंड |
| १७-२-१८ | ज्योत्स्ना गणपत तळपदे, | | भाई जीवनजी लेन |
| २३-२-१८ | श्रीम. ज्योत्स्ना शशीकांत झावबा, | वय ८४, | विलेपार्ले |
| २३-२-१८ | सौ. गीता सदाशिव गोरक्षकर, | वय ८४, | वाशिंद |

## पाठारे प्रभु चॅरिटीज

पाठारे प्रभु चॅरिटीजचे जानेवारी १८ चे न्यूजलेटर घरोघरी प्राप्त झाले. बक्षिस समारंभाचा वृत्तान्त, क्षणचित्रे, राणेवाडीतील वास्तूला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सुवर्णमहोत्सवी खास छायाचित्रांसहीत नोंद, माहेश्वरी देवीचा उत्सव, हिशोबाचा तक्ता आदी मजकूराने हा अंक माहितीपूर्ण आणि सुबक झाला आहे. अभिनंदन.

## निमंत्रण

पाठारे प्रभु को. हाऊसिंग सोसायटी लि. खार. चेअरमन, सचिव आणि व्यवस्थापन समिती आपणास जाहिर निमंत्रण देत आहे

श्री. अविनाश गोरक्षकर ह्यांनी समभाग (शेअर्स) इ. गुंतवणुकीच्या संदर्भात गाढे अध्ययन केले आहे. नफाप्राप्तीसाठी गुंतवणुकीचे प्रकार आणि त्या अनुषंगाने आपल्याला योग्य मार्गदर्शन व्हावे म्हणून दि. १७ मार्च शनिवार रोजी पाठारे प्रभु सांस्कृतिक केंद्र खार येथे २०१८ संध्याकाळी ५ वाजता त्यांचे ह्या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. त्यांचे सहकारी श्री तुषार जाधव यांचाही सहभाग आहे.

पाठारे प्रभु सहकारी संस्था आपणास आमंत्रित करीत आहे.

आपले नम्र.

श्री. अशोक तळपदे श्री. प्रसाद किर्तीकर
चेअरमन सेक्रेटरी

(पान २ कॉलम ४ वरून)

सांस्कृतिक केंद्र सभागृहात (खार) साजरा होईल. या मंगलप्रसंगी श्री. राजन वामन जयकर (बी. कॉम. एफ.सी. ए.) अध्यक्षस्थानी असतील. पुरस्कार सोहळ्याच्या मानकऱ्यांची यादी पुढील अंकी देण्यात येईल.

रविवार, दिनांक ११ मार्च २०१८ रोजी सायंकाळी ५ वाजता पाठारे प्रभु सोसायटी हॉल, १२ वा रस्ता, खार येथे सोशल समाजाची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. २०१८ मधील नवीन बदललेल्या नियमांना स्वीकृती देणे हा सभेपुढील विषय आहे. आवश्यक सभासदसंख्येच्या अभावी सभा तात्पुरती रद्द करून ती नियमाप्रमाणे सायंकाळी ५.३० वा. त्याचदिवशी, त्याच ठिकाणी घेण्यात येईल. सौ. नीता सेंजित (९८२०१६६६२८) आणि श्री. जयंत कीर्तिकर (९८६७९५८५३५) या सहकार्यवाहांकडे नियमांची प्रत उपलब्ध असेल.

✳

## अभिनंदन

सवंगडी ज्येष्ठ नागरिक संघ, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे तर्फे आयोजित नाट्यछटास्पर्धेत श्री. नंदकुमार विजयकर यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67